## बोडणाची आरती . . .

(बोडणाची/अन्नपूर्णेची - चाल आरती ज्ञानराजा)

**आरती अन्नपूर्णा । माझी येवूदे करुणा । आरती अन्नपूर्णा**
**नवरात्रीं नवमीला, थाट बोडणाचा केला, कुवार-सुवासिनी, तुम्हा करिते वंदना ।।**
**पायावर दुधपाणी, माझ्या तुळशी अंगणी, धरुनी प्रेमभाव, आता यावे हो सदना ।।**
**कोरिव काथोट, आंत कणिकेचा पाट, वरती बैसविली, तुझी मूर्ती सुवर्णा ।।**
**पाच दिवे पुरणाचे, माझ्या प्राणांचे, ओवाळी ते मनोभावे, वरी देते दक्षिणा ।**
**पाच पोळ्या, पाच पानी, वरी दही दुध लोणी, नैवेद्य ताटीचा; तुला करिते अर्पणा ।।**
**साडी चोळी जरी काठी, पाच फळांची ओटी, श्रीफळ मानाचे, देते सौभाग्य वाणा ।।**
**मनोभावे सेवा केली, त्याची प्रचीति आली, राहो कृपा-दृष्टी, अशी माझी प्रार्थना ।।**

सौजन्य - कवी - गोविंद वासुदेव रानडे

## बोडणाची रांगोळी














